# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **महाराष्ट्र शासनाच्या माझी वसुंधरा अभियान अंतर्गत महिला सशक्तीकरण व स्वच्छतेशी निगडित विषयांवर चित्रकला स्पर्धा संपन्न**
- **विविध शाळेतील 7 हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवली**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भाप्रसे) यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र शासनामार्फत सुरू करण्यात आलेल्या "माझी वसुंधरा" अभियान अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. शहरातील नागरिकांमध्ये जनजागृती करणेकामी या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून महानगरपालिकामार्फत शालेय विद्यार्थ्यांसाठी दिनांक 10 फेब्रुवारी 2024 रोजी महिला सशक्तीकरण व स्वच्छतेशी निगडित विषयांवर चित्रकला स्पर्धाचे आयोजन करण्यात आले.

सशक्त नारी, सशक्त देश, स्वच्छ परिसर निरोगी जीवन, विविध क्षेत्रातील महिलांचे यश, माझे मिरा भाईंदर स्वच्छ मिरा भाईंदर, कचरा वर्गिकरणाचे महत्त्व, सुशिक्षित महिला समृद्ध भारत या विषयांवर चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. महानगरपालिका कार्यक्षेत्रातील 75 शाळांनी या स्पर्धेत भाग घेऊन 7,000 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली. मा. आयुक्त यांनी स्पर्धेसाठी उपस्थित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व सांगत मा. आयुक्त यांनी सर्व विद्यार्थ्यांना "आपण भविष्य आहात, पर्यावरण संवर्धनाची व स्वच्छतेची सवय आतापासूनच अंगी बाळगून आपले भविष्य प्रदूषणमुक्त, हरित व प्लास्टिकमुक्त करण्यासाठी मोलाचे सहकार्य करावे" असे सांगितले. तद्नंतर मा. आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत माझी वसुंधरा व स्वच्छतेची शपथ घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी साकारलेली चित्रकला पाहून मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भाप्रसे) यांनी विद्यार्थ्यांच्या कौशल्याचे विशेष कौतुक करत सर्व विद्यार्थ्यांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर महापालिकेच्या शाळेचा दर्जा उंचावण्यासाठी महापालिका अधिकारी, मुख्याध्यापक व शिक्षक हे सदैव प्रयत्नशील राहतील असे प्रतिपादन मा. आयुक्त यांनी केले. सदर प्रसंगी अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त संजय शिंदे, उपायुक्त कल्पिता पिंपळे, शिक्षण अधिकारी सोनाली मातेकर, सहा. आयुक्त संजय दोंदे, सहा. आयुक्त योगेश गुणीजन, प्रशासकीय अधिकारी दिनेश कानगुडे, शालेय मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.